MHND170003952021

नियमित दिवाणी दावा क्रमांक ६२/२०२१ मधील निशाणी ३४ वरील आदेश.

1. प्रतिवादीने प्रसतुतचा अर्ज दि.प्र.सं. कलम ११ नुसार प्रस्तुतचा दावा खारीज करणे करिता दाखल केला आहे. प्रतिवादीचे कथन असे आहे की, प्रस्तुत वादीने हा दावा मौजे कांडली क्ड. या गावातील गट क्रमांक १४३ क्षेत्र ०१हे.८९आर पैकी ०१हे.०९आर क्षेत्राच्या वाटपा करिता व स्वतंत्र कब्जा करिता दाखल केला आहे. असे असले तरी याच मिळकतीचे वाटपा करिता यापुर्वी याच न्यायालयात नि.दि. दावा क्रमांक ३३/२०१३ हा दाखल होता व तो निकाली झाला आहे. पुर्वीच्या दाव्यात या मिळकती सोबत एकत्र कुटुंबाच्या अन्य शेत मिळकती देखील प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकती सोबत दाव्याचा विषय होत्या. पुर्वीच्या दाव्यातील पक्षकार देखील समान होते आणी तो दावा देखील वाटपा करिता व पृथक कब्जा करिताच होता. सबब तो दावा पुर्वीच गुणदोषांवर निकाली झाला असल्यामुळे या दाव्यास दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ११ ची बाधा येते व सबब तो याच कारणावर फेटाळणेस पात्र आहे. सबब हा अर्ज. प्रस्तुत अर्जा सोबत प्रतिवादींनी नि.दि. दावा क्रमांक ३३/२०१३ चे न्यायनिर्णयाची सत्यप्रत जोडली आहे.

2. वादींनी निशाणी ३५ येथे त्यांचे म्हणने दाखल करुन प्रतिवादीचे अर्जास हरकत घेतली आहे. वादीचे कथन असे आहे की, प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशीर आहे कारण पुवी्रा दावा नानाराव आणी इतर यांनी दावा मिळकती पैकी ०१.हे.८९आर क्षेत्राच्या वाटपा करिता दाखल केला होता, ते या दाव्यात पक्षकार नाहीत.नि.दि.दावा क्रमांक ३३/२०१३ मधील वादी यादाव्यात

पक्षकार नाहीत. सरते शेवटी वादीचे म्हणने असे आहे की, प्रतिवादींनी त्यांचे कैफियतीत प्रस्तुतचा मुद्दा उपस्थित केलेला नाही सबब त्यांना तो स्वतंत्रपण त्यांचा मुळ बचाव सोडुन मांडता येणार नाही.

3. अर्ज व त्यावरील म्हणने वाचले. दावा व कैफियत पाहिली. सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय बाजुचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. या दाव्यातील दावा मिळकतीचे वाटपा बाबत पुर्वी नि.दि.दावा क्र.३३/२०१३ दाखल होता व तो गुणदोषावर अंतिमतः निकाली झाला आहे, या बाबत उभ्य पक्षात दुमत नाही. या करिता प्रतिवादींनी दाखल केलेली नि.दि.दावा क्र.३३/२०१३ चे न्यायनिर्णयाची सत्यप्रत पाहिली असता असे दिसुन येते की, सदरील दावा कुटुंबाचे मुळ पुरूष मुकिंदा चे वारस म्हणजेच चंपती (प्रस्तुत दाव्यातील मुळ पुरूष), संभाजी, नारायण, हरी, दत्तराव आणी नानाराव यांचे दरम्यान गट क्रमांक १४३ क्षेत्र ०१हे.८९आर चे वाटप व पृथक कब्जा बाबत होता. तो दावा निकाली होऊन त्यात 'चंपती (प्रस्तुत दाव्यातील मुळ पुरूष), संभाजी, नारायण, हरी, दत्तराव आणी नानाराव' या सर्वांना प्रत्येकी १/६ इतका हिस्सा न्यायालयाने दिला आहे.

4. प्रस्तुतचा दावा पाहिला असता, तो चंपती (प्रस्तुत दाव्यातील मुळ पुरूष), यांचे वारसांनी त्याला नि.दि.दावा क्र.३३/२०१३ मध्ये मिळालेल्य १/६ हिस्याच्या वाटपा बाबत आहे. म्हणजेच प्रस्तुतचा दावा चंपती चे वारसांनी, त्यास म्हणजेच चंपतीला मिळालेल्या गट क्रमांक १४३ मधील हिस्यापैकी १/६ हिस्याचे वाटपा बाबत आहे व त्याचा 'संभाजी, नारायण, हरी, दत्तराव आणी नानाराव' यांना मिळालेल्या हिस्याशी काही देणे घेणे नाही. थोडक्यात हा दावा मुकींदाच्या वारसापैकी दुसऱ्या पिढीतील हिस्याचे वाटपा बाबत आहे.

फक्त माझे असे निरीक्षण आहे की, नि.दि.दावा क्र.३३/२०१३ मध्ये मयत चंपती ला जो वाटा मिळाला आहे, त्यापेक्षा जास्त क्षेत्रामध्ये प्रस्तुत वादी वाटा मागत आहेत. याचे कारण असे आहे की, जर नि.दि.दावा क्र.३३/२०१३ मधील चंपतीचा १/६ हिस्सा ठरवायचा झालेस तो साधारणपणे ३१आर इतका येऊ शकतो. असो परंतु ते अंतिमतः गुणदोषावर ठरेलच. परंतु प्रस्तुतचा दावा चंपतीचे वारसांनी, त्यास म्हणजेच चंपतीला मिळालेल्या हिस्यातील त्यांचे हिस्या बाबत मर्यादीत असा असलेमुळे आणी त्याचा 'संभाजी, नारायण, हरी, दत्तराव आणी नानाराव' यांना मिळालेल्या हिस्याशी काही देणे घेणे नाही याचा विचार करता या दाव्यास दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ११ ची बाधा येत नाही, असे माझे स्पष्ट व प्रामाणिक मत आहे. सबब मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श.

१. निशाणी ३४ वरील अर्ज नांमजुर करणेत येतो.

२. अर्जाचा खर्च प्रतिवादींवर राहील.

KIRAN RAJARAM KHONDRE

Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2024.06.14 13:59:28 +0530

**हिमायतनगर.**
दिनांक : १४ जुन २०२४.

(किरण रा. खोंद्रे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**हिमायतनगर**.